# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०१ ऑगस्ट २०१८.

### ‘सांगली- मिरज- कुपवाड’ आणि ‘जळगाव’मध्ये ५७ टक्के मतदान

मुंबई, दि. १ (रा.नि.आ.): सांगली- मिरज- कुपवाड आणि जळगाव महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज सरासरी ५७ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

सांगली- मिरज- कुपवाड महानगरपालिकेच्या २० प्रभागातील ७८ जागांसाठी प्राथमिक अंदाजानुसार ६० टक्के मतदान झाले. जळगाव महानगरपालिकेच्या १९ प्रभागातील ७५ जागांसाठी प्राथमिक अंदाजानुसार ५५ टक्के मतदान झाले. या दोन्ही ठिकाणी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी मतदानाची वेळ होती. सांगली- मिरज- कुपवाड महानगरपालिकेसाठी मतमोजणी ३ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)